संं.फौ.ख.क्र.४१/२०१४
सरकार वि. समाधान व इतर
न्यायनिर्णय –नि.क्र.५७

स्विकारल्याचा दिनांक : २१/०१/२०१४
नोंदणी दिनांक : २१/०१/२०१४
निकालाचा दिनांक : २१/०४/२०२६
कालावधी : १२ व., ०३ म., ०० दि.

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, माढा यांच्या न्यायालयात</u>**
(पिठासीन अधिकारी व्ही.सी.क्षीरसागर)

**भाग 'अ'**

| | |
|---|---|
| | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४१/२०१४**<br>**नि.क्र.५७**<br>CNR No.:MHSO170000152014 |
| **गुन्ह्याचा तपशिल** | माढा पोलिस ठाणे, गुन्हा रजि. क्र.३१/२०१३,<br>भा.दं.वि.कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच<br>मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अंमलदार,<br>माढा पोलीस ठाणे, जि. सोलापूर |
| **तर्फे प्रतिनिधी** | सरकारी अभियोक्ता श्री. ए. पी. काळे |
| **आरोपी** | १. समाधान अंकुश डोंगरे, वय – ३४ वर्षे, धंदा – शिक्षण<br>रा. आढेगाव, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| | २. संतोष विश्वनाथ भिसे, वय – ५४ वर्षे, धंदा – नोकरी<br>रा. कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर |
| **आरोपींतर्फे प्रतिनिधी** | विधिज्ञ श्री. जी. एस. त्रींबके व पी. व्ही. खोत |

**भाग 'ब'**

| **गुन्ह्याचा तपशिल** | | |
|---|---|---|
| गुन्ह्याची तारीख | : | दि.२४/०५/२०१३ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | : | दि.३१/०५/२०१३ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | दि.१०/१२/२०१३ |
| दोषारोप निश्चित तारीख | : | दि.०५/१२/२०१६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | दि.०४/०९/२०१९ |
| न्यायनिर्णय राखीव  ठेवल्याची तारीख | : | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | दि.२१/०४/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | : | -- |

| आरोपींचा तपशिल | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | दोषारोप ठेवलेले अपराध | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी |
| १ | समाधान डोंगरे | २६/११/२०१३ | ०५/१२/२०१६ | भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे | निर्दोष | – | – |
| २ | संतोष भिसे | १०/०६/२०१३ | १०/०६/२०१३ | | | | |

## भाग 'क'
## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | संजय बळीराम पाटील | घटनास्थळ पंच | २९ |
| २. | राजेंद्र मधुकर पाटोळे | पंच व ऐकीव साक्षीदार | ३१ |
| ३. | समाधान कोंडीबा इंगळे | ऐकीव साक्षीदार | ४० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | दिपील पंडू जाधव | फिर्यादी व तपासिक अधिकारी | ४४ |

**ब. बचावाचे साक्षीदार**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| | नाही | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| | नाही | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

**अ. सरकारी**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३० | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ४५ | अपघातग्रस्त वाहनांची तपासणीसाठी आरटीओ, अकलूज येथे केलेला पत्रव्यवहार |
| ३. | ४६ | फिर्याद |
| ४. | ४७ | प्रथम खबर अहवाल |

**ब. बचाव**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | नाही | – |

**क. न्यायालयीन निशाण्या**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | नाही | – |

**मुद्देमाल**

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | – | – |

**न्या य नि र्ण य**
**(घोषित दिनांक २१ एप्रिल, २०२६)**

प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपींविरुद्ध भा.दं.वि.कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ या गुन्हयासाठी खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

२. फिर्यादी डी. पी. जाधव हे माढा पोलिस स्टेशन येथे पोहेकॉ या पदावर कार्यरत होते. माढा पोलिस स्टेशन ठाणे मोटार अपघात क्र.६/२०१३ दि.२५/०५/२०१३ रोजी दाखल असलेला अपघात त्यांच्याकडे तपासा दिला असता त्यांनी दि.२५/०५/२०१३ रोजी अपघातस्थळी दोन पंचासमक्ष घटनास्थळ भेट दिली असता सदर ठिकाणी मौजे अंजनगाव खे. शिवारात माढा ते मोहोळ जाणारे डांबरी रोडवर इंडीका कार क्र.एम.एच.४५/ए.३८४० व हिरो होंडा मोटारसायकल नोंदणी क्र.एम.एच.१३/बी.८८६४ हे समोरासमोर धडक झाल्याने रस्त्यावरती पडलेले दिसले. त्यांनी तेथे पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. मोटारसायकल व कारचे साईड लाईट तुटून फुटून अस्ताव्यस्त पडलेले दिसले. रोडच्या मध्यभागी जखमीचे रक्त पडलेले दिसले. सदर कारचे बोनेट चेंबलेले असून चपटे होऊन उचकटलेले दिसले. कारच्या समोरच्या काचा जागीच तुटून चिरलेलो दिसला. कारचे रेडीएटर फुटलेले दिसले. कारचे हेडलाईट फुटलेले दिसले. सदर कारचे अंदाजे रक्कम रु.१,५०,०००/– चे नुकसान झालेले दिसले. मोटारसायकल ही

दक्षिणेकडे तोंड करुन डावे बाजूस पडलेले दिसले. तिचे हेडलाईट पुर्णपूणे फुटून तुटलेले दिसले. समोरील चाक पुर्णपणे बेंड होऊन पुर्णपणे चपटे झालेले दिसले. चेसी व बंपर पुर्णपणे बेंड झालेले दिसले. सीट फुटून बाहेर आलेले दिसले. मोटारसायकलचे अंदाजे रक्कम रु.२५,०००/– चे नुकसान झाले. रोडच्या सेंटरपासून उजवे बाजूस उत्तरेकडे माढाकडे तोंड करुन इंडिका कार उभी होती. कारपासून ८ फुट अंतरावर पाठीमागे मोटारसायकल पडलेली होती. त्यावेळी मोटारसायकलचा चालक व पाठीमागे बसलेला इसम अमोल महादेव कोळी यांनी सांगितले की, सदर कार चालक समोरुन भरधाव वेगाने येऊन त्यांना समोरुन धडक दिला व अपघातावेळी मोटारसायकल चालक समाधान डोंगरे हा गंभीर जखमी झाला असून त्याचे दोन्ही पाय व उजवा हात मोडलेला आहे. त्याचे हनुवटीवर मार लागल्याने त्याला बेशुध्द अवस्थेत ग्रामीण रुग्णालय, माढा येथून सोलापूर येथे उपचारास दाखल केले. त्याच्या डोक्यास मार लागल्याने उपचारासाठी राऊत हॉस्पीटल येथे दाखल केले. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुध्द माढा पोलिस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादवरुन माढा पोलिस स्टेशन येथे आरोपींविरुध्द गुन्हा रजि. क्र.३१/२०१३ भा.दं.वि.कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचे तपास काम पोहेकॉ डी. पी. जाधव, ब.नं. ९७५ यांनी केले. त्यांनी दि.२५/०५/२०१३ रोजी घटनास्थळी भेट देऊन घटनास्थळ पंचनामा तयार केले. घटनास्थळावरील दोन्ही वाहने एक मोटारसायकल नोंदणी क्र.एम.एच.१३/बी.८८६४ व एक कार नोंदणी क्र.एम.एच.४५/ए.३८४० ताब्यात घेतले. तसेच साक्षीदारांचे तपास टिपणे नोंदविले. दोन्ही वाहने तपासणीसाठी आरटीओ, अकलूज यांना पत्रव्यवहार केला. दोन्ही वाहनांची तपासणी अहवाल महिबूब मोटार गॅरेज यांच्याकडून प्राप्त केले. त्यांनी तपासाअंती न्यायालयामध्ये आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भा.दं.वि.कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये नि.क्र.१५ वर गुन्हाचा तपशिल ठेवण्यात आले. आरोपींनी सदर गुन्हयाचा तपशील वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी सदर गुन्हयाचा तपशील नाकारला व संपरिक्षेची मागणी केली. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)

(ब) प्रमाणे निवेदन अनुक्रमे निशाणी क्र.५५ व ५६ वर नोंदविण्यात आले. आरोपींनी बचावप्रित्यर्थ एकही साक्षीदार तपासला नाही.

५. अभियोगपक्षाचा साक्षीपुरावा पाहता आणि सहाय्यक सरकारी वकिल श्री. ए. पी. काळे व आरोपींतर्फे वकिल श्री. जी. एस. त्रींबके व पी. व्ही. खोत यांचा युक्तीवाद ऐकून खालील मुद्दे माझ्या विचाराधीन निघत असून, त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह देत आहे.

| अ.नु. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय की, दि.२४/०५/२०१३ रोजी रात्री ८.३० वा. सुमारास माढा ते मोहोळ जाणारे रोडवर, मौजे अंजनगाव खे, ता. माढा, जि. सोलापूर आरोपी समाधान अंकुश डोंगरे याने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल नोंदणी क्र.एम.एच.१३/बी.८८६४ व आरोपी संतोष विश्वनाथ भिसे याने त्याच्या ताब्यातील इंडीका विस्टा कार नोंदणी क्र.एम.एच.४५/ए.३८४० हे सार्वजनिक रस्त्यावरुन मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत वा क्षती पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालविली ? | नाही |
| २ | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपींनी त्यांच्या ताब्यातील वर नमूद वाहने निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवून स्वतः व साक्षीदारास गंभीर जखमी केले ? | नाही |
| ३ | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपींनी त्यांच्या ताब्यातील वर नमूद वाहने निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवून स्वतः व साक्षीदारास जखमी केले ? | नाही |
| ४ | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपींनी त्यांच्या ताब्यातील वर नमूद वाहने निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवून दोन्ही वाहनांचे नुकसान केले? | नाही |

| | | |
|---|---|---|
| ५ | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपींनी त्यांच्या ताब्यातील वर नमूद वाहने सार्वजनिक रस्त्यावरुन रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन वाहतुकीचे नियमांचे पालन न करता निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालविले? | नाही |
| ६ | काय आदेश? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

### मुद्या क्र.१ ते ५ करिता

६. मुद्ये क्र. १ ते ५ एकमेकांशी संलग्न असल्याने ते चर्चेकरिता एकत्रीत घेण्यात आलेली आहेत.

७. अभियोगपक्षाचे केस नुसार दि.२४/०५/२०१३ रोजी रात्री ८.३० वा. सुमारास माढा ते मोहोळ जाणारे रोडवर, मौजे अंजनगाव खे, ता. माढा, जि. सोलापूर आरोपी समाधान अंकुश डोंगरे याने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल नोंदणी क्र.एम.एच.१३/बी.८८६४ व आरोपी संतोष विश्वनाथ भिसे याने त्याच्या ताब्यातील इंडीका विस्टा कार नोंदणी क्र.एम.एच.४५/ए.३८४० हे सार्वजनिक रस्त्यावरुन मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत वा क्षती पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून स्वतः व साक्षीदारास गंभीर जखमी केले तसेच दोन्ही वाहनांचे नुकसान करुन सार्वजनिक रस्त्यावरुन रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन वाहतुकीचे नियमांचे पालन न करता निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालविले, हे सिध्द करणे गरजेचे आहे. आरोपीवरील सदर दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने सादर करण्यात आलेल्या पुराव्याचे ऊहापोह करणे गरजेचे आहे.

८. अभियोगपक्षातर्फे आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी एकूण चार

साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली आहे.

९. सा.क्र.१ संजय हे अभिलेखावरील घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार असून त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये दि.२५/०५/२०१३ रोजी ते माढा येथून सोलापूरला जात असताना अंजनगाव गावापासून एक ते दीड कि.मी. अंतरावरती पोलिस पंचनामा करत होते. तेथे इंडीका गाडीची समोरची काच, मोटारसायकलची समोरील रिम व समोरील भाग पुर्णपणे तुटलेले होते. पोलिसांनी त्यांच्यासमक्ष पंचनामा तयार केल्याचे कथन केले आहे. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी ते सोलापूर येथे एसटी किंवा रेल्वेने जात असल्याचे कथन करुन माढा ते सोलापूर रस्ता रहदारीचा असून तो यावलीपर्यंत ओबडधोबड स्वरुपाची व चढउताराचा असल्याचे त्यांनी मान्य केले. त्यांनी अंजनगावजवळ चढावरुन जात असताना समोरचे वाहन दिसत नसल्याचे मान्य केले आहे. त्यांनी त्यांचे गाव माढा लगत असल्याने त्यांचे पोलिस स्टेशनला नेहमी येणे जाणे असून त्यांचे पोलिसांशी चांगले संबंध असल्याचे मान्य केले आहे. त्यांनी इंडीका कार व मोटारसायकलचा क्रमांक सांगू शकत नसल्याचे कथन केले आहे. त्यांनी त्यांना पंचनामा करण्यासाठी कोणीही बोलावण्यासाठी आले नसल्याचे व घटनास्थळ कोणीही दाखविण्यासाठी आले नसल्याचे मान्य करुन माढाहून सोलापूरला जात असताना घटनास्थळावर काय झाले आहे हे पाहण्यासाठी ते थांबले होते. त्यावेळी तेथे पोलिसांनी त्यांची सही घेतल्याचे मान्य करुन इतर उत्तरसुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले आहे.

१०. सा.क्र.२ राजेंद्र हे अभिलेखावरील घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार असून त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये ते व गावातील काही मुले चौकामध्ये बसले असताना त्यांना मोटारसायकल व कार अपघात झाल्याचे कळाल्याने ते अपघात पाहण्यासाठी गेले असता तेथे एक मोटारसायकल व इंडीका कारचा अपघात झाला होता. एका इसमाच्या दोन्ही पायातून रक्तस्त्राव होत होता व तो बेशुध्द अवस्थेत होता. त्यावेळी त्यांनी एका गाडीस अडवून जखमी इसमास गाडीतून सरकारी दवाखान्यात घेऊन गेले. दुस–या दिवशी पोलिसांनी त्यांच्याकडे येऊन पंचनाम्यावर सही घेतल्याचे कथन केले आहे. त्यांनी त्यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केल्याचे नाकारले आहे. अभियोगपक्षातर्फे विचारण्यात आलेल्या उत्तरसुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिले आहेत व त्यांनी

पंचनाम्यातील मजकूर नाकारला आहे. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी अंजनगाव येथील पेट्रोल पंपाजवळ तीव्र वळण असून त्यामुळे समोरुन येणारे वाहन लक्षात येत नसल्याचे मान्य केले आहे.

११. सा.क्र.३ समाधान यांनी त्यांच्या साक्षीमध्ये दि.२५/०७/२०१३ रोजी रात्री ८.०० ते ९.०० वा. सुमारास लोकांनी त्यांना फोन करुन मोहोळकडे जाणा–या रस्त्यावरती एक चारचाकी व मोटारसायकलचा अपघात झाल्याचे कळाल्याने ते त्याठिकाणी गेले असता त्यांना मोटारसायकलवरील दोघेजण समाधान अंकुश डोंगरे व कोळी असे जखमी अवस्थेत खाली पडले असून त्यांनी त्यांना उपचारकामी गाडीवर पाठविले असल्याचे कथन केले आहे. त्यांनी अपघातातील वाहनांचे नोंदणी क्रमांक त्यांना आठवत नसल्याचे तसेच दोन्ही वाहनांचे नुकसान झाल्याचे कथन केले आहे. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी अपघात त्यांनी प्रत्यक्षात पाहिले नसल्याचे, ऐकीव माहितीवरुन आरोपीच्या निष्काळजीपणाबाबत सांगत असल्याचे तसेच अपघात हा कोणाच्या चुकीमुळे झाला हे सांगू शकत नसल्याचे मान्य करुन इतर उत्तरसुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिले आहे.

१२. सा.क्र.४ दिलीप यांनी त्यांच्या साक्षीमध्ये दि.२४/०५/२०१३ रोजी विश्वनाथ भिसे यांनी माढा पोलिस स्टेशन येथे अपघाताची खबर दिल्याचे तसेच त्यांना शासकीय रुग्णालयामध्ये दोन जखमींना उपचाराकामी दाखल केल्याची खबर मिळाल्याचे कथन केले आहे. त्यांनी दि.२५/०५/२०१३ रोजी घटनास्थळी भेट देऊन घटनास्थळ पंचनामा तयार केल्याचे तसेच घटनास्थळावरील दोन्ही वाहने एक मोटारसायकल नोंदणी क्र.एम.एच.१३/बी.८८६४ व एक कार नोंदणी क्र.एम.एच.४५/ए.३८४० ताब्यात घेतल्याचे तसेच साक्षीदारांचे तपास टिपणे नोंदविल्याचे, दोन्ही वाहने तपासणीसाठी आरटीओ, अकलूज यांना पत्रव्यवहार केल्याचे, दोन्ही वाहनांची तपासणी अहवाल महिबूब मोटार गॅरेज यांच्याकडून प्राप्त केल्याचे कथन केले आहे. त्यांनी तपासाअंती आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्याचे कथन केले आहे.

१३. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी पोलिस खात्यामध्ये ३३ वर्षे नोकरी केली असल्याचे कथन करुन त्यांनी सोलापूर ते माढा हा रस्ता रहदारीचा

असल्याचे, पंच संजय बळीराम पाटील हे निमगाव, ता. माढा येथे राहत असल्याचे तसेच घटनेची खबर पोलिस स्टेशन येथे मिळाल्यानंतर त्यांना अपघाताची चौकशी केली असल्याचे मान्य केले आहे. त्यांनी आरोपींना मोटार वाहन कायद्यान्वये चौकशीकामी नोटीस दिली नसल्याचे कथन करुन खबर केव्हा मिळाली हे सांगू शकत नसल्याचे कथन केले आहे. त्यांनी घटनास्थळ हे तीव्र उताराचे असून घटनास्थळावरती सोलापूरकडून माढाकडे उतार असल्याचे कथन करुन इतर उत्तरसुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले आहे.

१४. अभिलेखावरील अभियोगपक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता अभियोगपक्षाचे मुख्य साक्षीदार क्र.४ फिर्यादी व तपासिक अधिकारी डी. पी. जाधव यांनी फिर्यादप्रमाणे कथन करुन फिर्याद निशाणी क्र.४६ सिध्द केले असले तरी त्यांनी सदर अपघात प्रत्यक्षात न पाहता फिर्याद ऐकीव माहितीच्या आधारे दाखल केले असल्याचे दिसून येते. त्यांनी खबर देणारे विश्वनाथ भिसे यांचे तपासटिपण नोंदविले नसल्याचे दिसून येते. अभियोगपक्षाने खबर देणारे विश्वनाथ भिसे तसेच मोटारसायकलवरील पाठीमागे बसलेले जखमी इसम अमोल महादेव कोळी यांना तपासले नसल्याचे दिसून येते. सदर घटना दि.२४/०५/२०१३ रोजी रात्री ८.०० वा. सुमारास माढा रोडवरील अंजनगाव शिवारात रस्त्यावरती घडल्याचे दिसून येते. अभिलेखावरुन घटनास्थळ हे गजबजलेले ठिकाण असल्याचे दिसून येते. परंतु, अभियोगपक्षाने एकही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे फिर्यादीच्या साक्षीस स्वतंत्र साक्षीदाराच्या साक्षीची पुष्टी मिळत नाही. सा.क्र.३ समाधान हे घटना घडल्यानंतर घटनास्थळी गेल्याचे दिसून येते. त्यांच्या साक्षीवरुन त्यांनी सदर अपघात प्रत्यक्षात पाहिले नसल्याचे दिसून येते. ते वाहनांचे नोंदणी क्रमांक सांगू शकत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांच्या साक्षीचा फारसा उपयोग अभियोगपक्षास होत नाही. फिर्यादीने आरोपीस पाहिले नसल्याने तसेच अभियोगपक्षाने एकही प्रत्यक्षदर्शी इतर साक्षीदार तपासले नसल्याने तथाकथित घटनेवेळी आरोपी त्यांच्या ताब्यातील वाहने चालवित असलेबाबत कोणताही स्पष्ट पुरावा अभिलेखावर आलेला दिसून येत नाही. तसेच अभिलेखावरील एकाही साक्षीदाराने आरोपींनी तथाकथित घटनेवेळी त्यांच्या ताब्यातील वाहने निष्काळजीपणे, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगाने तसेच रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवत असलेबाबत काहीही कथन केले नसल्याचे दिसून येते.

१५. सा.क्र.१ हे घटनास्थळावरील पंच साक्षीदार असून त्यांनी घटनास्थळ पंचनामा निशाणी ३० सिध्द केला असला तरी त्यांनी देखील घटनास्थळावर असलेली अपघातग्रस्त वाहनांची स्थिती तसेच जखमी इसमांची स्थिती, घटनास्थळावरील प्रत्यक्ष वस्तुस्थिती याबाबत काहीही कथन केले नसल्याचे दिसून येते. सा.क्र.२ राजेंद्र हे अभिलेखावरील घटनास्थळ पंच साक्षीदार असून त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्याचे दिसून येते. सा.क्र.४ दिलीप फिर्यादी व तपासिक अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला असला तरी त्यांनी तसेच सा.क्र.३ समाधान यांनी त्यांच्या साक्षीमध्ये त्यांनी घटनास्थळावर असलेली अपघातग्रस्त वाहनांची स्थिती तसेच जखमी इसमांची स्थिती, घटनास्थळावरील प्रत्यक्ष वस्तुस्थिती तसेच वाहनांचे झालेले नुकसान याबाबत काहीही कथन केले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे घटनास्थळावरील नेमके वस्तुस्थितीचे व परिस्थितीचे वर्णन, घटनास्थळावरती उभी असलेली दोन्ही वाहनांची रस्त्यावरील नेमकी स्थिती याबाबत कोणताही स्पष्ट पुरावा अभिलेखावर आलेला दिसून येत नाही.

१६. अभियोगपक्षाच्या एकंदरीत पुराव्यावरुन सदर अपघात एक चारचाकी वाहन व मोटारसायकल यांच्यामध्ये झाल्याचे दिसून येते. परंतु, फिर्यादीने तसेच अभिलेखावरील एकाही साक्षीदाराने आरोपींना त्यांची वाहने चालवत असताना पाहिले नसल्याचे दिसून येते. फिर्यादी तसेच अभिलेखावरील एकाही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने आरोपींनी तथाकथित घटनेवेळी त्यांच्या ताब्यातील वाहने हयगयीने, निष्काळजीपणे चालवत असलेबाबत काहीही कथन केले नसल्याचे दिसून येते. अभियोगपक्षाने घटनेवेळी हजर असलेले एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच खबर देणारे विश्वनाथ भिसे, जखमी साक्षीदार अमोल महादेव कोळी व घटनास्थळ दाखविणारे चंद्रकांत नवनाथ पाटील यांना तपासले नसल्याचे दिसून येते. सा.क्र.१ संजय हे घटनास्थळवरील पंच साक्षीदार असले तरी त्यांनी तसेच तपासिक अधिकारी यांनी घटनास्थळावरील नेमके वस्तुस्थितीचे व परिस्थितीचे वर्णन, घटनास्थळावरती उभी असलेली दोन्ही वाहनांची रस्त्यावरील नेमकी स्थिती याबाबत काहीही कथन केले नसल्याचे दिसून येते. सा.क्र.२ राजेंद्र यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्याचे दिसून येते. अभिलेखावरील एकाही साक्षीदाराने आरोपींविरुध्द काहीही कथन केले नसल्याने आरोपींच्या चुकीमुळे अपघात झाला यासंदर्भाने कोणतेही स्पष्ट पुरावा

अभिलेखावर आलेला दिसून येत नाही. त्यामुळे आरोपींचा प्रस्तुत गुन्हयाशी संबंध होता हे स्पष्ट होत नाही. तसेच घटनेच्या वेळी अपघातस्थळावर नक्की काय परिस्थीती होती व नेमकी कोणाची चुक अपघातास कारणीभुत होती या सर्व बाबींबाबत कोणताही स्पष्ट पुरावा न आल्याने आरोपींविरुध्द तोहमत असलेला गुन्हा संशयापलीकडे जावून सिध्द होत नाही.

१७. वरील चर्चेवरुन सदर तथाकथित घटनेवेळी दि.२४/०५/२०१३ रोजी रात्री ८.३० वा. सुमारास माढा ते मोहोळ जाणारे रोडवर, मौजे अंजनगाव खे, ता. माढा, जि. सोलापूर आरोपी समाधान अंकुश डोंगरे याने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल नोंदणी क्र.एम.एच.१३/बी.८८६४ व आरोपी संतोष विश्वनाथ भिसे याने त्याच्या ताब्यातील इंडीका विस्टा कार नोंदणी क्र.एम.एच.४५/ए.३८४० हे सार्वजनिक रस्त्यावरुन मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत वा क्षती पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून स्वतः व साक्षीदारास गंभीर जखमी केले तसेच दोन्ही वाहनांचे नुकसान करुन सार्वजनिक रस्त्यावरुन रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन वाहतुकीचे नियमांचे पालन न करता निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालविले, हे निसंशय सिद्ध होत नाही. त्यामुळे आरोपींनी भा.दं.वि कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा केला, हे निसंशय सिद्ध होत नाही. आरोपींविरुध्दचा दोषारोप निसंशयपणे सिद्ध होईपर्यत आरोपी निर्दोष आहे हे फौजदारी कायदयाचे मुळ गृहीतक आहे. एकंदरीत आरोपींविरुध्दचा दोषारोप निसंशयपणे सिद्ध होत नाही व संशयाचा फायदा आरोपींना जातो. त्यामुळे मुद्या क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे व मुद्या क्र.५ साठी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ समाधान अंकुश डोंगरे व क्र.२ संतोष विश्वनाथ भिसे यांची भा.दं.वि कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपींचे वैयक्तिक बंधपत्र व पुर्वी दिलेला जामीन रद्य करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७ (अ) प्रमाणे अपील कालावधीकरिता प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व जातमुचलका द्यावे. |
| ४. | सदर न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हादंडाधिकारी, सोलापूर यांना फौ.प्र.सं. कलम ३६५ प्रमाणे पाठविण्यात यावे. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायासनावर निवेदित व घोषीत)

VAIBHAVI CHANDRAHAR KSHIRSAGAR
Digitally signed by VAIBHAVI CHANDRAHAR KSHIRSAGAR
Date: 2026.04.21 15:48:29 +0530

(व्ही.सी.क्षीरसागर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, माढा

दि.२१/०४/२०२६

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word for word as per original Order. | | |
| Name of Stenographer | : | N. B. Kamurti |
| Court Name | : | Smt. V.C. Kshirsagar<br>2nd Jt.CJJD & JMFC, Madha |
| Date of Order/Judgment | : | 21/04/2026 |
| Order/judgment signed by presiding officer on | : | 21/04/2026 |
| Order/judgment uploaded on | : | 21/04/2026 |